# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

तार — EDUTECH E-mail : desk16@dte.org.in Internet :http/www.dte.org


क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१३/२६८

दिनांक : 9 DEC 2013

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

२) सचिव, म.रा.तं.शि. मंडळ मुंबई

विषय :- २६ जानेवारी, २०१४ या प्रजासत्ताक दिनी मुख्य ध्वजारोहण सोहळयात चित्ररथांचे सादरीकरण करण्याबाबत...

उपरोक्त विषयाबाबतचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्रमांक संकीर्ण ११११/प्र.क्र. १५९/१३/समन्वय, दिनांक २२.११.२०१३ सहपत्रासह सोबत जोडत आहे.

सदर प्रकरणी वरील पत्राच्या अनुषंगाने योग्य ती पुढील कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालिल संस्था / कार्यालये यांना कळविण्यात यावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल या संचालनालयास सादर करावा जेणेकरून शासनास सादर करणे शक्य होईल.

( दयानंद मेश्राम )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०१३/ १६०
दिनांक :- 1 JAN 2014

अतितात्काळ

प्रति,
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद
उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद,
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद, जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद, बीड
पु.ला.शा.तं.लातूर, नि.म.त.नि.लातूर

उपरोक्त संदर्भिय पत्रात नमूद केल्याप्रमाणे **२६ जानेवारी २०१४ या प्रजासत्ताक दिनी मुख्य ध्वजारोहण** सोहळयात चित्ररथांचे सादरीकरण करणेबाबतची योग्य ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा जेणेकरुन सदर अहवाल संचालनालयास सादर करणे शक्य होईल.

**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद**

प्रत: या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीस्तव, या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

महाराष्ट्र शासन

अतितात्काळ

क्र.संकीर्ण-१११९/प्र.क्र.१५९/१३/समन्वय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :- २२ नोव्हेंबर , २०१३.

प्रति,

सर्व सह सचिव /उप सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई.
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (२ प्रती)
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- २६ जानेवारी, २०१४ या प्रजासत्ताक दिनी मुख्य ध्वजारोहण सोहळयात चित्ररथांचे सादरीकरण करण्याबाबत.

उपरोक्त विषयावरील मा. मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण आणि राजशिष्टाचार यांचे दि. ०२/११/२०१३ चे पत्र व त्यावरील मा. मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे निदेश कृपया पहावेत (प्रत सोबत जोडली आहे.)

२. सदर पत्रानुषंगाने योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात यावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांना सादर करण्यात यावा. ही विनंती.

आपली,

(शैला तारगे पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र :- वरीलप्रमाणे

D:\C Drive Data\DESK OFFICER\General Letter.docx

प्र.आ व कु.क आणि राजशि.
व्हीआयपी3539/2013
दिनांक 31/10/2013

सं.क्र. मं 9370/93 रथमन्वय

जा.क्र./मंत्री/उ.व तं.शि/व्हिआयपी/
दिनांक 4577

प्रधान सचिव
उच्च व तंत्र शिक्षण
कार्यालय
क्र. 4577
दि. 1-11-13

मंत्री
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण
आणि राजशिष्टाचार
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : 2/11/2013

महोदय,

गतवर्षी प्रमाणे याही वर्षी प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य शासकीय सोहळयात चित्ररथांचा समावेश करण्यात येणार आहे. शासकीय योजना तसेच विकास कार्यक्रमाची प्रगती आणि राज्याची प्रतिमा संवर्धनच्यादृष्टीने अनुषांगिक विषयावर हे चित्ररथ आधारित असतात.

2. या सोहळयामध्ये आपल्या विभागाशी संबंधित योजनांवर चित्ररथ तयार करावा आणि संचलन सोहळयामध्ये सहभागी व्हावे यादृष्टीने राजशिष्टाचार विभागाने यापूर्वीच एक पत्र सर्व विभागांना पाठविलेले आहे. त्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. आपणास विनंती करण्यात येते की, यासंदर्भात आपले स्तरावरुन देखील विविध विभागांचे चित्ररथ सहभागी व्हावेत याकरीता कृपया संबंधितांना योग्य ते निर्देश द्यावेत.

आपला

(सुरेश शेट्टी)

सा.श्रीम. पाटील

प्रति,

**मा.ना.श्री.राजेश टोपे**
**मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण,**
**मंत्रालय**

मा. प्र.स. उ. व तं. शि
कृ. पत्रकातील सूचनेप्रमाणे
कार्यवाही करावी

(राजेश टोपे)
मंत्री
उच्च व तंत्र शिक्षण
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

2/11/13

महाराष्ट्र शासन

क्र. सीईआर/१०१३/प्र.क्र.१८६५/३०(राजशिष्टाचार)
सामान्य प्रशासन विभाग,
१ ला मजला, सचिवालय जिमखाना,
मंत्रालयासमोर, मुंबई.
दिनांक : २७ सप्टेंबर, २०१३.

प्रति,

सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव/सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई.

विषय – <u>२६ जानेवारी, २०१४ या प्रजासत्ताक दिनी मुख्य ध्वजारोहण सोहळ्यात चित्ररथांचे सादरीकरण करण्याबाबत.</u>

महोदय,

२६ जानेवारी, २०१४ या प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या मुख्य ध्वजारोहण सोहळ्यात गतवर्षीप्रमाणे चित्ररथांचे सादरीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. तरी, आपल्या विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबत सर्वसामान्य जनतेला माहिती व्हावी या दृष्टीकोनातून आपल्या विभागामार्फत सादर करावयाच्या चित्ररथांविषयी सर्वकष माहिती तसेच चित्ररथांसाठी वापरण्यात यावयाची वाहने व देखाव्याचे स्वरुप / कला पथके व त्याबाबतची संकल्पना याबाबत माहिती दि. ३० ऑक्टोबर, २०१३ पर्यंत या विभागास पाठविण्यात यावी, ही विनंती. यासंदर्भातील तपशील सोबत जोडला आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

आपला,

(ना.शि.भोगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

ON 5/10/2013
BY ....
ISSUED

प्रजासत्ताक दिन मुख्य ध्वजारोहण समारंभ 2013.

चित्ररथ व कलापथक

टिपणी

1. 26 जानेवारी या प्रजासत्ताक दिनाच्या शिवाजी पार्क येथे होणाऱ्या ध्वजारोहणाच्या मुख्य सोहळ्यात या वर्षीपासून चित्ररथाचा समावेश करण्याचे तसेच हा सोहळा अधिक रंगतदार आणि प्रभावी करण्याचे मा. मुख्यमंत्रीमहोदयांचे निदेश आहेत. त्यानुसार राज्य शासनाच्या विभागांना त्यांच्यासंदर्भातील विषयावरील चित्ररथाचे आयोजन करण्यास सांगण्यात आले आहे. राज्याची विविध क्षेत्रातील प्रगती, शासनाच्या योजना, कल्याणकारी कार्यक्रम, संस्कृती आणि लोकजीवन यांचे चित्रण जनसामान्यांपुढे करण्यासाठी प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य सोहळ्यात चित्ररथांचा समावेश करण्यात येणार आहे.
2. राज्य शासनाच्या विविध विभागांनी त्यांच्या अखत्यातील निमशासकीय कार्यालये / महामंडळे यांच्यामार्फत चित्ररथ तयार करुन घ्यावयाचे आहेत. विभाग आणि चित्ररथांचे विषय यांची यादी सोबत स्वतंत्र जोडली आहे.
3. चित्ररथाकरिता राजशिष्टाचार विभाग किंवा गृह विभाग निधी उपलब्ध करून देणार नाही. संबंधित विभागांना आपल्याकडील किंवा विषयानुसार त्यांच्या अंतर्गत असलेली मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे यांच्याकडील प्रसिद्धी/प्रचार/जनसंपर्क/जाहिरात यासाठीच्या निधीचा उपयोग करता येईल.
4. चित्ररथ म्हणजे वाहनावर केवळ फ्लेक्स बोर्ड लावणे अपेक्षित नाही. दिल्लीत प्रजासत्ताक दिनी राजपथावर ज्याप्रमाणे संपूर्ण वाहन सजविण्यात येते त्याप्रमाणे विषयाला अनुसरून चित्ररथाचा विषय

प्रभावीपणे प्रेक्षकांपर्यंत पोहचेल अशी व्यावसायिक (प्रोफेशनल) दर्जाची सौंदर्यपूर्ण कलात्मक आणि कल्पक सजावट करणे अपेक्षित आहे. त्यासाठी सुयोग्य वाहनाचा उपयोगात आणण्यास सांगण्यात आले आहे. चित्ररथ उभारणीकरिता त्याक्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचे/ कलाकारांचे सहकार्य अंमलबजावणी करणारी यंत्रणा घेतील.

5. चित्ररथाची संकल्पना व विषय लक्षात घेऊन संबंधित विभाग किमान एक ते कमाल दोन मिनिट कालावधीचे विशेष गीत/संगीत (जिंगल) या प्रसंगासाठी तयार करून घेतील. विषयाच्या गरजेनुसार चित्ररथावर व चित्ररथासमोर कलाकार असू शकतील.
6. मुख्य संचलन (मार्चिंग कंटिजंट)पार पाडल्यानंतर मार्चिंग कंटिजंटच्या शेवटच्या संचलन पथकापाठोपाठ चित्ररथ आणि कलापथक हे क्रमाने मैदानावर येतील. साधारणत: 13 चित्ररथ आणि शालेय मुलांचे सहा बँड्स आणि आदिवासी कलाकारांची सहा पथके यात असतील. यासाठी चित्ररथाची वाहने व कलाकार आणि मार्चिंग कंटिजंटच्या संचलन पथकांचे संयोजन करणारी पोलिस यंत्रणा यांच्यात समन्वय ठेवण्याचे काम पोलिस करतील.
7. प्रत्येक चित्ररथ हा मुख्य अतिथींच्या मंचासमोर एक ते दोन मिनिटांसाठी थांबेल. या चित्ररथाच्या सादरीकरणानंतर तो पुढे मार्गस्थ होईल.
8. सहभागी विभागांनी पाठविलेल्या चित्ररथांचे संकल्प चित्र आणि चित्ररथ उभारणीचा तपशील समजून घेऊन उभारणीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी पुढील सदस्यांची समिती असेल.:-
   1) अधिष्ठाता, जे.जे. उपयोजित कला महाविद्यालय
   2) विभाग प्रमुख (नाट्य विभाग) मुंबई विद्यापीठ
   3) विभाग प्रमुख (लोककला विभाग) मुंबई विद्यापीठ
   4) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय,